दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजश भांगे

बीड/महाराष्ट्र | रविवार दि.२ मार्च २०२५ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक-१२६ | पाने ४ | किंमत ४ रुपये

## फडणवीसांचा एकनाथ शिंदेंना पुन्हा झटका


**मुंबई-**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुन्हा एकदा माजी मंत्र्यांना झटका देत आरोग्य विभागातील ३२०० कोटी रुपयांच्या कामांना स्थगिती दिली आहे. या कामांसाठी काढलेल्या टेंडरची रक्कम फुगवण्यात आली असून यात घोटाळा झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. त्यामुळे आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा एकनाथ शिंदे यांच्या मंत्राला दिलेला मोठा झटका मानला जात आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागील सरकारच्या कार्यकाळात झालेल्या कामांना स्थगिती देण्याचा सपाटा लावला असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे यातील अनेक कामे ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षातील सहकारी मंत्र्यांची आहेत. यामध्ये आता माजी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांच्या आरोग्य विभागातील तीन हजार दोनशे कोटी रुपयांच्या कामांना फडणवीस सरकारने स्थगिती दिली आहे. आरोग्य मंत्रालयाच्या अखत्यारीत असलेल्या सर्व शासकीय रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रांची बाह्य यंत्रणेद्वारे तांत्रिक पद्धतीने साफसफाई करण्यासाठी वार्षिक ६३८ कोटी याप्रमाणे पाच वर्षांसाठी सुमारे ३ हजार १९० कोटी रुपयांची कामे तानाजी सावंत यांनी पुण्यातील एका खासगी कंपनीला मंजूर केली होती.

## कार्यकर्त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी काही वक्तव्य केली जातात

# शिंदेंचे पुण्यात भगवा फडकवण्याच्या वक्तव्यावर अजित पवारांची प्रतिक्रिया

**पुणे (वृत्तसंस्था)-**महायुती म्हणून आम्हाला जनतेने बहुमत दिले आहे. पण प्रत्येकाला आपला-आपला पक्ष वाढवण्याचा अधिकार आहे. एकनाथ शिंदे शिवसेनेचे नेते आहेत ते असे म्हणणारच की आपल्याला भगवा फडकवायचा आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटले आहे.अजित पवार पुढे बोलताना म्हणाले की, एकनाथ शिंदे महाराष्ट्रभरात कुठेही गेले तरी प्रत्येक जिल्ह्यात तसे सांगू शकतात. देवेंद्र फडणवीस जर कोणत्याही जिल्ह्यात गेले तर तो जिल्हा भाजपमय करायचा आहे. मी गेलो तर मी ही तेच सांगणार की आपल्याला सत्ता मिळवायची आहे.अजित पवार म्हणाले की, महायुतीमधील तिन्ही पक्षांनी एकजुटीने राहण्याचे ठरवले आहे. शेवटी आम्ही काही जरी म्हटलो तरी जनताच ठरवते कुणाला निवडून द्यायचे आहे. त्यांनी शिवसैनिकांमध्ये उत्साह निर्माण व्हावा म्हणून असे म्हटल्याचे अजित पवारांनी म्हटले आहे.अजित पवार म्हणाले की, माझ्यासह सर्वांनीच सबुरीने वागले पाहिजे. मी कुठले प्रकरण डोळ्यासमोर ठेवत बोलत नाही. आम्ही सामान्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करत आहोत. गुन्हेगारीच्या वाढलेल्या घटना घडूच नये असे आम्हाला वाटत आहे. पण जर घडलेच तर त्यांचा तपास योग्य रितीने करु दिले पाहिजे.अजित पवार म्हणाले की, पुणे अत्याचार प्रकरणानंतर काही जणांनी बस डेपोची तोडफोड केली. एकदा वस्तुस्थिती पुढे आले की तोडफोड करणाऱ्यावरही कारवाई केली जाणार आहे. ज्यांने नुकसान केले त्यांच्याकडून ही संपूर्ण वसूली केली पाहिजे, असे कोर्टाने सांगितले आहे. राग व्यक्त करण्याचा पद्धत असते असे सार्वजनिक मालमत्तांची तोडफोड करणाऱ्यांवर कारवाई केली जाणार, असा इशारा वसंत मोरेंचे नाव न घेता दिला आहे.अजित पवार म्हणाले की, आरोग्य मंत्री यांनी स्तुत्य उपक्रम राबविला त्यांचे कौतुक. परिवाराचे आरोग्य चांगले आहे का नाही हे पाहण्यासाठी आरोग्य तपासणी महत्वाची. फुले, शाहू, आंबेडकर विचारांच्या महाराष्ट्रात जन्माला आलेलं मुलं सुदृढ असली पाहिजेत. कॅन्सरचे प्रमाण वाढत आहे यावर सुद्धा कशी लस देता येईल याचा विचार आम्ही करत आहोत. शालेय मुलांच्या पायाच्या नखांपासून केसांपर्यंत सर्व आरोग्य तपासणी करणार आहोत. बाल स्वास्थ कार्यक्रम राज्यातील सर्व विद्यार्थ्यांसाठी महत्वाचा आहे.

अजित पवार म्हणाले की, स्वारगेटला जे काही झाले ते चुकीचंच आहे. या प्रकरणातील आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हायला हवी. आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. घटनास्थळाच्या आसपासचे सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी मिळवले आहे. या सीसीटीव्ही फुटेजमधून बऱ्याच गोष्टी समोर आल्या आहेत. पोलिस चौकशीत आरोपीचा जबाब, इतर साक्षी-पुरावे पोलिसांकडे आहेत. आरोपीला कठोर शासन होईल. तसेच आपल्या राज्यातील प्रत्येक मुलीचे, बहिणीचे, महिलेचे संरक्षण व्हायला हवे. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्याला दाखवलेल्या वाटेवर आपण चालायचे आहे.



## अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेची परतूर तालुका कार्यकारिणी जाहीर



**जालना । असलम कुरेशी**

अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेची परतूर येथे बैठक संपन्न झाली. यावेळी अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेची परतूर तालुका कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

अखिल महाराष्ट्र उर्दू शिक्षक संघटनेच्या परतूर तालुकाध्यक्ष पदी अन्सारी बद्रोद्दीन, तालुका सचिव पदी शेख मुकसीत अहेमद, तालुका कार्याध्यक्ष पदी मिर्झा कलीम बेग, तालुका कोषाध्यक्ष पदी एजाज देशमुख यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. याप्रसंगी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना जिल्हाध्यक्ष जावेद खान यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देऊन अभिनंदन करण्यात आले. यावेळी जिल्हा सहसचिव मोहम्मद इकबाल, पठाण इरशाद खान, शेख शकील अहमद, खतीब नईमोद्दीन, शेख अफसर, अन्सारी रफीक, अय्युब खान, शेख चाँद, ज़ाकेर हाश्मी, मोहम्मद रियाज़ोद्दीन, मोहम्मद इरफ़ान, अब्दुल मुनाफ़, जुनेद पटेल, सादिक़ पंजवानी, अब्दुल मजीद आदी उपस्थित होते. यावेळी सर्वांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करुन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

## परीक्षा केंद्रांवर पथक, अधिकाऱ्यांना धमक्या

**छ. संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

जिल्ह्यातील दहावी, बारावीच्या परीक्षा केंद्रांवरील काही तक्रारी आल्यानंतर त्या ठिकाणचा स्टाफ बदलण्यात आला आहे. त्यानंतर नेमलेल्या केंद्र संचालक, पर्यवेक्षकांना संबंधित केंद्राच्या परिसरातील नागरिक, पालकांकडून धमक्या देण्यात येत असल्याची धक्कादायक माहिती माध्यमिकच्या शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर यांनी दिली.



जिल्ह्यातील दहावी, बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त घेण्यासाठी शिक्षण विभागासह महसूल विभाग प्रयत्न करीत आहे. त्यानुसार भरारी पथकांनी भेट दिलेल्या ठिकाणी गडबड असल्याचे निदर्शनास आल्यानंतर संबंधित ठिकाणचा संपूर्ण स्टाफ बदलला आहे. नवीन स्टाफ कॉपी होऊ देत नसल्यामुळे काही केंद्रांवर संचालक, पर्यवेक्षकांना धमकावण्यात येत असल्याचे प्रकार घडले, पैठण तालुक्यातील श्रीराम माध्यमिक विद्यालय, बोकूड जळगाव या ठिकाणी कॉपी करू देण्यासाठी केंद्र संचालकांना धमकावण्यात आले. मग शिक्षणाधिकांनी सहायक पो. निरीक्षक नीलेश शेळके यांना कळविले. त्यांनी अतिरिक्त बंदोबस्त पाठविल्याचे शिक्षणाधिकारी लाठकर यांनी सांगितले.

**आठ केंद्रे कायमस्वरूपी बंद करण्याची शिफारस**

जिल्ह्यात परीक्षेत गडबड करणाऱ्या सहा केंद्रे आगामी वर्षापासून केंद्र कायमस्वरूपी बंद करण्याची शिफारस विभागीय मंडळाकडे केली आहे.. त्यामध्ये निमगाव आणि ओव्हर जटवाडा या ठिकाणच्या केंद्रांची भर पडली असल्यामुळे एकूण आठ केंद्रांवर आतापर्यंत कारवाईचा बडगा उगारण्यात आल्याचेही शिक्षणाधिकारी लाठकर यांनी सांगितले.


अन्य काही विद्यालयांतील परीक्षा केंद्रावरही काहींनी संचालक व पर्यवेक्षकांना धमकावले. खुलताबाद तालुक्यातील शांताराई कनिष्ठ महाविद्यालयाच्या परीक्षा केंद्रावरील संपूर्ण स्टाफ बदलून जि.प.च्या प्राथमिक शाळेतील स्टाफ देण्यात आला. त्या ठिकाणी विस्तार अधिकारी भोसले यांना समन्वयक नेमले होते. त्यांनी उत्तमपणे परीक्षा घेतल्याबद्दल सीईओ विकास मीना यांनी त्यांचे अभिनंदन केल्याचेही लाठकर यांनी सांगितले.

## शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी ठोस उपाययोजना आखाव्यात

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब यांची विधानमंडळाच्या सभापतींकडे मागणी

अंबाजोगाई : १९ मार्च हा दिवस शेतकरी सहवेदना दिवस म्हणून पाळण्यात यावा. तसेच विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलावून आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करावी व शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी ठोस उपाययोजना आखाव्यात. अशी मागणी किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब यांनी एका पत्राद्वारे विधानमंडळाचे सभापती यांच्याकडे केली आहे.



या पत्रात नमुद करण्यात आले आहे. की, १९ मार्च १९८६ रोजी साहेबराव करपे यांच्या कुटूंबियांनी सामुहिक आत्महत्या केली होती. या दुर्दवी घटनेला १९ मार्च रोजी ३९ वर्षे पुर्ण होत आहेत. या घटनेने संपुर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला होता. त्यानंतरही सातत्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरूच आहेत. अत्यंत खेदजनक बाब अशी की, देशात सर्वात जास्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या महाराष्ट्रात होत आहेत. असे घडताना देखील महाराष्ट्र विधानसभेने आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांप्रती सहवेदना व्यक्त केली नाही. अथवा दोन मिनिटे मौन पाळुन साधी श्रद्धांजलीही अर्पण केली नाही. किसानपुत्र आंदोलनाच्या निरिक्षणानुसार आज शेती हेच उत्पन्नाचे मुख्य साधन असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या १० ते १५ टक्के राहिली आहे. जेंव्हा ५० ते ६० टक्के संख्या होती. तेंव्हा महाराष्ट्रात रोज सात शेतकरी आत्महत्या करीत होते. आज शेतीवर पुर्णपणे अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या घटली आहे. तरीही आत्महत्या त्याच प्रमाणात होत आहेत. या संदर्भात सभापती यांनी इतर सर्व योजना बंद करून संकटग्रस्त शेतकऱ्यांना दरमहा १८ हजार रूपये देण्याची व्यवस्था करावी. शेतीवर पुर्णपणे अवंलबून असणाऱ्या दहा ते पंधरा टक्के शेतकऱ्यांकडे शेती बाह्य उत्पन्न आले तर त्यांच्याही आत्महत्या टळतील. तसेच शेतकरी विरोधी असलेले. स्लिंग, आवश्यक वस्तु, अधिग्रहन हे कायदे रद्द करावेत. अशी मागणी अमर हबीब यांनी केली आहे.

## राजर्षी शाहू ता ग्रामीण नागरी सहकारी पतसंस्थेची निवडणुक बिनविरोध

**केज । प्रतिनिधी**

केज येथील राजर्षी शाहू ता ग्रामीण नागरी सहकारी पतसंस्था म.केज या पत संस्थेची सन २०२५- २०३० या पंचवार्षिक कालावधी करीता चेअरमन , व्हा. चेअरमन, व संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध पार पडली. संस्थेचा कारभार योग्य रीतीने सुरु असल्यामुळे अनावश्यक खर्च टाळुन निवडणूक बिनविरोध करण्यात आली या बिनविरोध निवडणुकीसाठी संस्थेचे व्यवस्थापक प्रवीण भिसे लिपिक राजेश साखरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले

.या संस्थेच्या चेअरमन पदी रमेश शिंदे,तर व्हा. चेअरमन पदी लालासाहेब वायबसे यांची बिनविरोध निवड करण्यात आली या निवडी बद्दल . येडेश्वरी साखर कारखान्याचे चेअरमन तथा खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी सर्व संचालक मंडळाचे अभिनंदन केले आहे यावेळी श्री. गायकवाड वचिष्ठ रामरतन,श्री.जाधव विजयसिंह रावसाहेब, श्री.थोरात राजपाल प्रकाश, श्री . जाधव श्रीहरी चंद्रसेन,सय्यद शरीफ सय्यद पाशा श्री.पोटभरे माणिक रावण. श्री. संभाजी लोमटे श्री.तारळकर अशोक सदाशिव, श्री.नाळवंडीकर प्रकाश श्री. करपे संदीप अंकुशराव, श्री . गणेश शिंदे साहाय्यक निबंधक कार्यालयाचे जगदाळे साहेब, मुंडे साहेब,पवार साहेब मुख्य कार्यकारी अधिकारी अजित आरेकर व संस्थेचे सभासद उपस्थित होते.



## अंबाजोगाई जिल्ह्याच्या आशा पल्लवित: आयुक्तालयाच्या विभाजनासाठी सरकारने मागविला अहवाल

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

छत्रपती संभाजीनगरच्या विभागीय आयुक्तालयाचे विभाजन करण्यासाठी राज्य सरकारने एक पाऊल पुढे टाकले असून या संदर्भात ९ वर्षापूर्वी दांगट समितीने सादर केलेला अहवाल राज्य सरकारने मागविला आहे. नांदेड व लातूर यांच्यात वाद होऊ नये, यासाठी छत्रपती संभाजीनगरच्या विभागीय आयुक्त कार्यालयाचे त्रिभाजन करण्याची शिफारस तत्कालीन दांगट समितीने केली होती. लातूर विभागीय आयुक्त कार्यालयाची निर्मिती झाल्यास अंबाजोगाई जिल्हा होणार आहे. तशी शिफारस या अहवालात करण्यात आल्याने अंबाजोगाई जिल्हा निर्मितीच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.




अंबाजोगाई जिल्ह्याची निर्मिती करावी, ही मागणी गेल्या ३५ वर्षांपासून अंबाजोगाईकर सातत्याने करत आहेत. यासाठी अनेक तीव्र आंदोलने झाली. जिल्हा निर्मितीसाठी अंबाजोगाईकरांचे शिष्टमंडळ बहुतांश मुख्यमंत्र्यांना भेटले. त्यांनी जिल्हा जाहीर करण्याचे आश्वासन दिले, मात्र ते हवेतच विरघळले. माजी मंत्री विमल मुंदडा यांनी त्यांच्या कार्यकाळात जिल्हा निर्मितीसाठी लागणारे सर्वच शासकीय कार्यालयाची उभारणी केली, ते कार्यरतही आहेत. नवीन अंबाजोगाई जिल्हा निर्मिती करण्यासाठी शासकीय तिजोरीवर कुठलाही आर्थिक ताण पडणार नाही. ६ जानेवारी २००९ ला तत्कालीन विभागीय आयुक्त दिलीप बंड यांनी बीड जिल्हा विभाजनाचा अहवाल शासनाकडे पाठवला होता. विभागीय आयुक्त दिलीप बंड समितीने दिलेल्या निकषानुसार अंबाजोगाई जिल्हा जाहीर करावा, अशी मागणी अंबाजोगाई जिल्हा कृती समिती सातत्याने करित आहे. पण, त्याही मागणीला अजूनही यश आले नाही.

राज्य सरकारने आता तत्कालीन डॉ. उमाकांत दांगट समितीचा अहवाल मागविला असल्याने अंबाजोगाई जिल्हा निर्मीतीचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चिला जात आहे. पण येथील लोकप्रतिनिधींनी जिल्हा निर्मीतीच्या प्रश्नाला बगल दिल्याने गेल्या कित्येक वर्षांपासून हा प्रश्न शासनदरबारी धूळखात पडला आहे. बीड जिल्ह्याचे विभाजन करुन अंबाजोगाई जिल्ह्याची घोषणा करण्यात यावी, अशी मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे, हे मात्र निश्चित आहे

## कु.शर्मिष्ठा बाळासाहेब डोंगरे हिचे नेट परीक्षेत उज्वल यश

**आष्टी । रविंद्रनाथ ठाकूर**

यूजीसीद्वारे आयोजित छएढ परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून अॅड.शर्मिष्ठा बाळासाहेब डोंगरे हिने यश संपादन केले आहे.पुण्यातील खडड लॉ कॉलेजमधून डडइ पूर्ण केल्यानंतर तिने महाराष्ट्र लॉ कॉलेज, पवई येथे डडच् प्रथम श्रेणीत पूर्ण केले. तिचे मूळ गाव मांची, ता. संगमनेर असून तिचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण महात्मा फुले कृषी विद्यापीठातील सावित्रीबाई फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात झाले आहे. तसेच पुणे आकाशवाणी आणि अहिल्या नगर ऋच् केंद्रावर तिने विविध विषयांवर विचार मांडले आहेत.



तिच्या या यशाबद्दल महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ. साताप्पा खरबडे, निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे राज्य अध्यक्ष प्रमोददादा मोरे,डॉ.प्रमोद रसाळ, सचिव डॉ.महानंद माने,महेश घाडगे,डॉ.उल्हास सुर्वे, डॉ. ज्ञानेश्वर क्षीरसागर,डॉ.सोपान मोरे,सचिन गाडेकर,मुख्याध्यापक अरुण तुपविहिरे,जितेंद्र मेटकर, मनोज बावा,संतोष जाधव, कार्याध्यक्ष छायाताई राजपूत, सचिव वनश्रीताई मोरे - गुणवरे, सहसचिव संजय गायकवाड, हरिदास शिंदे, आदर्श सरपंच बाळासाहेब ढोले, बाळासाहेब गाडेकर, डॉ.शरद दुधाट,तसेच राज्य प्रसिद्ध प्रमुख 'तथा लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष अण्णासाहेब साबळे यांनी अभिनंदन केले.


## संपादकीय..

# २७ वर्षांनंतर दिल्लीत भाजपाचे सरकार



दिल्लीच्या नवव्या मुख्यमंत्री म्हणून भाजपाच्या रेखा गुप्ता यांनी गुरुवारी शपथ घेतली. तब्बल २७ वर्षांनंतर दिल्लीत भाजपाचे सरकार स्थापन झाले. भाजपाच्या सुषमा स्वराज यांच्या नेतृत्वाखालील सरकार काँग्रेसने हटवले व शीला दीक्षित पंधरा वर्षे मुख्यमंत्री राहिल्या. नंतर काँग्रेसचे सरकार 'आप'ने हटवले व अरविंद केजरीवाल व शेवटचे काही महिने आतिशी मुख्यमंत्री राहिल्या. यावर्षी ८ फेब्रुवारीला दिल्ली विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला व भाजपाला निर्विवाद बहुमत प्राप्त झाले. दोन तृतियांशपेक्षा जास्त जागा भाजपाने जिंकल्या. मोदींची लोकप्रियता, करिष्मा सर्वश्रेष्ठ असल्याचे निकालाने सिद्ध केले. मोदींच्या जादूने कमाल केली आणि केंद्रात हटट्रीक संपादन करणाऱ्या भाजपाने दिल्लीतही कमळ फुलवले. देशभरात २१ राज्यांत आता भाजपा सत्तेवर आहे, हा सुद्धा मोठा विक्रम आहे.दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर सरकार स्थापन व्हायला बारा दिवस लागले. दिल्लीची सत्ता भाजपाला मिळाली पण दिल्लीचा मुख्यमंत्री कोण होणार याची संपूर्ण देशाला उत्सुकता होती. दिल्लीच्या निवडणुकीत भाजपाने मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर केला नव्हता. त्यामुळे केजरीवाल यांच्यानंतर दिल्लीचा मुख्यमंत्री कोण यावर अनेक तर्क-वितर्क प्रकट झाले. पण भाजपा श्रेष्ठींनी रेखा गुप्ता यांची या पदासाठी निवड करून आश्चर्याचा धक्का दिलाच पण पक्ष संघटना व कार्यकर्त्यांना यांना आपण महत्त्व देतो हे पंतप्रधान नरेद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा व पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी सर्व देशाला दाखवून दिले. रेखा गुप्ता दिल्लीच्या चौथ्या महिला मुख्यमंत्री आहेत. सुषमा स्वराज, शीला दीक्षित आणि आतिशी यांच्यानंतर हा मान त्यांना मिळाला आहे. सुषमा स्वराज व आतिशी यांना मुख्यंमत्रीपदावर राहण्याची संधी अल्पकाळ मिळाली होती. तर शीला दीक्षित या सलग तीन टर्म मुख्यमंत्री होत्या. रेखा गुप्ता यांची मुख्यमंत्रीपदासाठी निवड करताना पक्ष श्रेष्ठींनी निवडून आलेल्या दिग्गजांची नावे बाजूला ठेवली हेही लक्षात घेण्यासारखे आहे. रेखा गुप्ता या संघ परिवाराच्या संस्कारातूनच पुढे आल्या. विद्यार्थी असताना त्या अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे झोकून काम करीत असायच्या. त्यांना कोणतीही राजकीय कौटुंबिक पार्श्वभूमी नाही. राजकीय घराणेशाहीचा आरोप त्यांच्यावर चुकूनही कोणाला करता येणार नाही. सार्वजनिक जीवनात काम करणारी मध्यमवर्गीय गृहिणी म्हणजे रेखा गुप्ता हीच त्यांची दिल्लीतील प्रतिमा आहे. वाजपेयी-अडवाणींच्या काळापासून त्या पक्ष संघटनेत सक्रिय आहेत. त्यांचा राजकीय प्रवास म्हणजे पक्ष निष्ठा, इमानदारी व कार्यक्षमता सिद्ध करणारा आहे.शालिमार बाग मतदारसंघातून प्रथमच आमदार झालेल्या ५० वर्षीय रेखा गुप्ता यांचे सर्वसामान्य जनतेतूनही उत्स्फूर्त स्वागत झालेले बघायला मिळाले. विधानसभा निवडणूक काळात मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान म्हणून ओळखला जाणारा शीशमहाल खूप गाजला होता. शीशमहालच्या नूतनीकरणावर आप सरकारने ४५ कोटी खर्च केल्याचा आरोप भाजपाने केला होता. शीशमहाल हे भ्रष्टाचाराचे प्रतीक बनले होते. मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर रेखा गुप्ता यांनी आपण वादग्रस्त शीशमहालमध्ये राहायला जाणार नाही असे जाहीर करून टाकले व त्याचे दिल्लीकरांनी कौतुकही केले. त्या म्हणाल्या-माझ्यावर पंतप्रधान मोदी व पक्षाच्या हायकमांडने जो विश्वास दाखवला त्याबद्दल मी त्यांचे आभार मानते. मी कधीच विचार केला नव्हता की मी दिल्लीची मुख्यमंत्री होईन, पण मी त्या काचेच्या महालात राहायला जाणार नाही. रेखा गुप्ता या उच्चशिक्षित असून पेशाने वकील आहेत. एनडीएच्या त्या एकमेव महिला मुख्यमंत्री आहेत. त्यांनी कॉलेज जीवनात दिल्ली विद्यापीठ विद्यार्थी संघाचे सचिव म्हणून काम केले. भाजपा युवा मोर्चा दिल्लीच्या त्या सचिव होत्या, पीतमपुरा व शालिमार बाग प्रभागातून त्या तीन वेळा नगरसेवक म्हणून निवडून आल्या, दिल्ली प्रदेश महिला मोर्चाच्या त्या सरचिटणीस होत्या, भाजपाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीवर सदस्य होत्या. संघटनेचा त्यांना मोठा अनुभव आहे, त्याच कामाची पावती म्हणून श्रेष्ठींनी त्यांच्यावर दिल्लीचे मुख्यमंत्री म्हणून सेवा करण्याची जबाबदारी सोपवली. शालिमार बाग मतदारसंघातून यंदा त्यांनी आप व काँग्रेस अशा दोन्ही उमेदवारांचा पराभव करून २९,५९५ मतांनी विजय मिळवला ही सुद्धा त्यांची जमेची बाजू आहे. शीला दीक्षित किंवा अरविंद केजरीवाल हे दोन्ही मुख्यमंत्री नवी दिल्ली मतदारसंघाने दिले होते. रेखा गुप्ता मात्र शालिमार बागमधून निवडून आल्या आहेत. यंदाच्या निवडणुकीत नवी दिल्ली मतदारसंघातून भाजपाचे प्रवेश वर्मा यांनी अरविंद केजरीवाल यांचा नवी दिल्ली मतदारसंघात दणदणीत पराभव केला. प्रवेश यांचे वडील साहबसिंह वर्मा हे दिल्लीचे भाजपाचे मुख्यमंत्री होते. प्रवेश यांनी केजरीवाल यांचा पराभव केल्याने त्यांना मीडियाने जायंट किलर अशी मोठी प्रसिद्धी दिली. तेच मुख्यमंत्री होतील असे अंदाजही व्यक्त झाले. खरं तर दिल्लीच्या मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत पक्षाचे सहा दिग्गज नेते होते. पण मोदी-शहांनी रेखा गुप्ता या प्रसिद्धीपासून दूर असलेल्या महिला कार्यकर्तीची निवड केली व भाजपा महिला सक्षमीकरणाला कसे प्राधान्य देते हा त्यातून संदेश दिला. दिल्लीच्या ऐतिहासिक रामलीला मैदानावर झालेल्या शानदार शपथविधी सोहळ्यास स्वत: पंतप्रधान नरेद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसेच देशातील भाजपाचे मुख्यमंत्री आणि एनडीएचे उपमुख्यमंत्री आवर्जून हजर होते. भाजपाचे सरकार दिल्लीत स्थापन झाले तरी आम्ही एनडीएला बरोबर घेऊन कारभार चालवत आहोत, असा विश्वास भाजपाने सर्व मित्रपक्षांना दिला आहे. दिल्लीकर जनतेने भाजपाला प्रचंड बहुमत देऊन दिल्लीची सत्ता दिली आहे म्हणूनच दिल्लीकरांच्या अपेक्षाही उंचावल्या आहेत.

# प्रयत्नामध्ये सातत्य हवे




जीवनामध्ये यशवंत होण्यासाठी प्रयत्न आणि सातत्य या दोन बाबी अतिशय महत्त्वाच्या असतात. आपल्या प्रयत्नामध्ये सातत्य असल्यास आपले ध्येय सहज पार पाडू शकतो. तेव्हा आपल्या प्रयत्नाला यश मिळाल्यामुळे स्वत:ला शिस्त आणि परिश्रम घेण्याची जिद्द निर्माण होऊन यातून काम करण्याची शक्ती मिळते. विद्यार्थ्यांनी विद्यार्थी दशेत यश संपादन करण्यासाठी आपल्या प्रयत्नात सातत्य टिकून ठेवायला हवे. त्यासाठी नियमित अभ्यास व आपल्याला समजले नसल्यास शिक्षकांकडून समजून घेऊन प्रयत्न करायला पाहिजे. तसेच प्रयत्नात प्रामाणिकपणे सातत्य असायला हवे म्हणजे यशाच्या मार्गात कोणत्याही प्रकारचा अडथळा निर्माण होत नाही. त्यासाठी खूप परिश्रम घ्यावे लागतात. याची जाणीव विद्यार्थ्यांना होण्यासाठी थोडक्यात घेतलेला वेध

आपल्याला कोणत्याही क्षेत्रात यश मिळविण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करावे लागतील. त्या प्रयत्नात सातत्य असले पाहिजे. यासाठी विशिष्ट कालावधी गृहीत धरावा लागतो. विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष असते त्या शैक्षणिक वर्षात एकूण विषय व प्रत्येक दिवशी अभ्यास करण्यासाठी दिला जाणारा वेळ आणि त्यावेळेत त्या विषयाचा केलेला अभ्यास. असा नियमित अभ्यास करायला हवा. केवळ विद्यार्थ्यांनी एक दिवस प्रयत्न करून चालणार नाही तर त्या प्रयत्नात सातत्य असायला हवे. ते सुद्धा दर दिवशी तरच आपण शैक्षणिक क्षेत्रात घवघवीत यश मिळवू शकतो. त्यासाठी प्रत्येक विषयातील संकल्पना नीट समजून घेणे आवश्यक आहे. मनाची जिद्द, एकाग्रता व आवड निर्माण करायला हवी. विद्यार्थ्यांनी अभ्यास करताना आळसाने अभ्यास करू नये. कारण आळस हा माणसाचा सर्वात मोठा क्षत्रू आहे. तेव्हा आपल्या आवडीच्या क्षेत्रात यश साकारण्यासाठी आळस बाजूला सारून वेळेला महत्त्व द्यावे. जीवनात वेळ महत्त्वाची असते. त्यात दिलेल्या वेळेत सातत्यपूर्ण प्रयत्न केल्यास उत्तम कामगिरी आपल्या क्षेत्रात करू शकतो. तेव्हा प्रत्येकाच्या जीवनात यशाचा मार्ग म्हणजे प्रयत्न आणि सातत्य होय. या यशाच्या दोन बाजू आहेत. त्यामुळे जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रयत्न आणि सातत्य अतिशय महत्त्वाचे असते.

विद्यार्थ्यांनी यश मिळविण्यासाठी अपयशावर मात केली पाहिजे. त्यासाठी अपयश पचविण्यासाठी मनाचा मोठेपणा असावा लागतो. पाहा ना! मागील आठवड्यात एका कॅन्टीनमध्ये महाविद्यालयातील शिक्षण घेणारी विद्यार्थिनी गेली ती सुद्धा कॅन्टीनच्या किचन रूममध्ये आणि काहीच बोलत नव्हती. काही वेळाने तिने हातात लाईटर घेऊन शेगडी पेटविण्याचा प्रयत्न केला. नंतर ऑईल दे दो ऑईल दे दो अशी म्हणायला लागली. हा प्रकार समजता तिला किचन रूममधून बाहेर आणण्यात आले. त्यानंतर ती मोठमोठ्याने रडू लागली. नंतर सर्वांच्या लक्षात आले की, ती मुलगी नापास झाल्याने अशा मार्गाचा ती अवलंब करीत होती. तेव्हा संशोधकांनी अशा विषयांवर संशोधन करणे गरजेचे आहे. एखाद्या परीक्षेत सर्वच विद्यार्थी पास होतात असे नाही; परंतु या मुलीला केवळ नापास झाल्याने कॅन्टीनच्या किचनमध्ये जाऊन आता आपण पास होणारच नाही या भीतीने शेवटचे पाहूल उचलत होती. तसेच बोर्डाच्या बारावीच्या पहिल्या पेपरला पुण्यातील एका विद्यार्थ्यांने प्रश्नपत्रिका हातात आल्यानंतर पहिल्या मजल्यावरून खाली उडी मारली. तेव्हा अशी वेळ विद्यार्थ्यांवर का आली? याचा विचार होणे आवश्यक आहे.

अपयश ही यशाची पहिली पायरी असते असे म्हटले जाते. मात्र प्रयत्नामध्ये सातत्य असेल तर नक्कीच आपल्याला यश संपादन करता येईल. तेव्हा कोणतेही यश संपादन करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावे लागतील. जीवनात यशाच्या उंच शिखरावर जायचे असेल तर प्रयत्न अतिशय महत्त्वाचा असतो. त्या प्रयत्नामध्ये सातत्य महत्त्वाचे असते. हे आजच्या विद्यार्थ्यांनी लक्षात घेतले पाहिजे. परीक्षा आली की, परीक्षेच्या आदल्या दिवशी मित्राला मोबाईलवरून फोन करायचा. त्यावर पहाटेपर्यंत विषयाच्या परीक्षेच्या दृष्टीने चर्चा करायची. मग दुसऱ्या दिवशी तीन तास पेपर कसा लिहिणार? खरंच सांगा एका रात्रीत अभ्यास होईल का? मग परीक्षेच्या काही तास आई-वडिलांना सांगायचे माझे डोके दुखते, अंग थरथरते, मला काहीच अभ्यासाचे सुचत नाही, मी आता परीक्षेला जात नाही? असे अनेक प्रश्न परीक्षेच्या दिवशी विद्यार्थ्यांसमोर निर्माण होतात. म्हणून अभ्यासक्रम निवडल्यानंतर आणि अभ्यासक्रमाला सुरुवात झाल्यावर नियमित अभ्यास करावा. समजा एखादी मूळ संकल्पना समजली नसेल, तर अध्यापकांकडून इतर वेळेत समजून घ्यावी.यातच विद्यार्थ्यांच्या मनाचा मोठेपणा आहे. आपली प्रगती करून घेण्यासाठी सातत्य महत्त्वाचे असते. यातून यश साध्य झाल्यावर अधिक उत्साह वाढतो. यासाठी आवड असणे जरूरीचे असते. मुळात एखाद्या विषयाची आवडच नसेल तर प्रयत्नात सातत्य कसे निर्माण होणार. हा खरा प्रश्न आहे. तेव्हा विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या क्षेत्राकडे वळावे. जर आवडीच्या क्षेत्रात प्रवेश मिळाला नाही तर ज्या क्षेत्रात प्रवेश मिळणार असेल तो समजून घेता आला पाहिजे. त्यासाठी प्रयत्नात सातत्य टिकवता आले पाहिजे. तेव्हा प्रत्येक विद्यार्थ्यांच्या जीवनात प्रयत्न आणि सातत्य या दोन गोष्टींचा योग्यप्रकारे वापर केल्यास आयुष्यात अशक्य असे काहीच नसते. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या प्रयत्नामध्ये सातत्य हवे.

# कृत्रिम बुद्धिमत्तेच्या अवकाशात




कृत्रिम बुद्धीमत्तेच्या अवकाशात अमेरिका आणि चीनसारखे तगडे देश आधीपासूनच स्थान राखून असताना पुढील सहा महिन्यांमध्ये भारतही त्यात प्रवेश करत असल्याची बातमी महत्त्वपूर्ण म्हणायला हवी. येणारे युग कृत्रिम बुद्धीमत्तेचे असल्याचे एव्हाना सिद्ध झाले आहे. त्यामुळेच भारत उपलब्ध यंत्रणेच्या पायावर या अवकाशातील आपले इमले रचतो की नव्याने पायाभरणी करतो, हे बघावे लागेल.

अमेरिका आणि चीनपाठोपाठ आता भारतही एआयच्या क्षेत्रामध्ये पाऊल ठेवत असल्याची बातमी अनेकार्थाने महत्त्वपूर्ण म्हणावी लागेल. विशेषत: जगभर 'डिपसीक'चा बोलबाला असताना भारतीयांनी या बदलाचे महत्त्व आणि होणारे परिणाम जाणून घेणे गरजेचे आहे. अर्थातच त्यासाठी पार्श्वभूमी जाणून घेणे गरजेचे आहे. गेल्या काही वर्षांमध्ये एआय अर्थात कृत्रीम बुद्धिमत्ता हा घटक सर्वसामान्यांच्या आयुष्याशी जोडला गेला आहे. तो त्यांची अनेक कामे सोपी, सुलभ करत असल्याने याची उपयुक्तता आणि आवश्यकता सर्वसामान्यांना समजली आहे. दुसरीकडे, याविषयीची भीतीही बघायला मिळते. अनेकांचे रोजगार जातील का, हा प्रश्नही वारंवार विचारला जातो. मात्र या भीतीपोटी आता चॅटजीपीटीचा वापर थांबणे शक्य नाही. याद्वारे आपल्याला अत्यंत समर्पक उत्तरे मिळतात. केवळ माहितीच नव्हे तर जोडीला व्हीडिओ, ऑडिओ, प्रतिमा हे सगळेही मिळते. चॅटजीपीटीच्या या तंत्रज्ञानामागे लार्ज लँग्वेज मॉडेल (एलएलएम) नामक तंत्रज्ञान वापरले जाते. यातील तांत्रिकतेकडे न बघता अगदी सोप्या भाषेत सांगायचे, तर गुगलचे सर्च इंजिन आणि चॅटजीपीटी यातील फरक लक्षात घेता समजते की, सर्च इंजिनवर आपण आवश्यक ती माहिती पुरवण्याची मागणी नमूद करतो आणि त्यानुसार ते संबंधित माहिती पुरवते. मात्र चॅटजीपीटी वापरत असणाऱ्या एलएलएमकडून मिळालेल्या माहितीचे स्वरूप शब्द पुरवलेल्या मजकुराचे नसते, तर माणसाची नैसर्गिक भाषा अर्थात नॅचरल लँग्वेज प्रोसेसग समजून घेण्याची क्षमता या अत्याधुनिक तंत्रज्ञानात असते. म्हणजेच एखाद्या माणसाला समजतो तसा त्याला विचारलेला प्रश्न समजतो आणि तो समजून माणूस उत्तर देईल, तशा प्रकारे आपल्याजवळ असणाऱ्या माहितीच्या ढिगाऱ्यातून बिनचूक माहिती तो समोर मांडतो. एलएलएमला हे महत्त्व असल्यामुळे तंत्रज्ञानातील नवीन टप्पा अर्थात जनरेटिव्ह एआय असे म्हणतात.नवनिर्मिती करण्याची क्षमता त्याला वेगळे महत्त्व देऊन जाते. थोडक्यात, आपण याला अल्लाउद्दिनचा जादूचा दिवा म्हणू शकतो. असे हे ओपन एआयचे तंत्रज्ञान जगासमोर आणल्यानंतर लोक अक्षरश: चाट पडले होते, कारण आपल्यासमोर असे काही येईल, याची कल्पनाही त्यांनी केली नव्हती. पुढे याच धर्तीवर अल्फाबेट कंपनीचे जेमिनी, फेसबुकच्या मेटा कंपनीचे लामा असे तंत्रज्ञान समोर आले. त्यामुळे या क्षेत्रावर अमेरिकेचे मक्तेदार असल्याचे चित्रही स्पष्ट झाले. ते खरेही होते. या तंत्रज्ञानासाठी माहितीचे मोठमोठे ढीग उपसावे लागतात. त्यासाठी संगणकाची प्रचंड मोठी क्षमता वापरावी लागते. सर्वसामान्यपणे संगणकाचे काम चालवण्यासाठी सेंट्रल प्रोसेसग युनिटचा वापर होतो. तो संगणकाचा मेंदू असतो. मात्र एआयमध्ये हा मेंदू पुरेसा ठरत नाही. म्हणूनच त्यासाठी विशिष्ट प्रकारची चीप वापरली जाते. त्याला ग्राफिकल प्रोसेसग युनिट (जीपीयू) असे म्हणतात. हे जीपीयू तयार करणारी अमेरिकेतील 'एनव्हिडिया' ही कंपनी असून तिची या कामात मक्तेदारी आहे. या चीपच्या बळावर सगळी कामे वेगाने केली जातात आणि म्हणूनच हे काम फक्त अमेरिकेतच होऊ शकते, असे समजले जात होते.एआयमधील आपली एकाधिकारशाही टिकवण्यासाठी काही दिवसांपूर्वी अमेरिकेने या चीप्सच्या निर्मितीवर मर्यादा घातल्या होत्या आणि चीनला चीप्सची आयात करता येऊ नये, अशा प्रकारचे नियमही आणले होते. मात्र हे सगळे अडथळे पार करून त्यांच्या 'डिपसीक' या कंपनीने एका वर्षांच्या आत ओपनएआय, जेमिनी, लामा या सगळ्यांसारखे एलएलएम अत्यल्प खर्चामध्ये उभे करून दाखवले. त्याची क्षमता ओपनएआय वा वर उल्लेख केलेल्या कंपन्यांसारखीच आहे. त्यामुळेच चीनकडून पुढे आणल्या गेलेल्या या तंत्रज्ञानाने जगाला मोठा धक्का बसला. याचे जागतिक परिणामही बघायला मिळाले. अगदी सर्वसामान्य लोकही याचा विनामूल्य वापर करु शकणार असल्याने स्पर्धेला तोंड फुटल्याची भीती व्यक्त केली गेली. कंपन्यांना ओपनएआयचा व्यावसायिक वापर करायचा असेल, तर पैसे भरावे लागतात. मेटाचे 'लामा' हे सॉफ्टवेअर मात्र फुकट आहे. त्याला ओपन सोर्स म्हटले जाते. आता डिपसीक कंपनीचे बाजारात आलेले एलएलएमही ओपन सोर्स असणे हादेखील एक मोठा आणि महत्त्वाचा घटक समजला गेला. त्यामुळेच चॅटजीपीटी वा जेमिनी या कंपन्यांना सॉफ्टवेअरमधून मिळणाऱ्या निधीला धोका पोहोचण्याची भीती वाढली आणि जागतिक पातळीवर त्याचे आर्थिक पडसाद बघायला मिळाले. या सगळ्या पार्श्वभूमीवर सध्याच्या चर्चेप्रमाणे लार्ज लँग्वेज मॉडेल (एलएलएम) ची निर्मिती भारत नव्याने करणार आहे की त्यासाठी सध्या उपलब्ध असणारे तंत्रज्ञानच वापरणार, याची स्पष्टता अद्याप आलेली नाही. आहे ते तंत्रज्ञान वापरून भारत या क्षेत्रात उतरणार असेल तर हे इतके मोठे काम वा महत्त्वपूर्ण बाब वाटणार नाही. मात्र भारत नव्याने हे तंत्रज्ञान विकसित करणार असेल आणि भारताशी संबंधित असणाऱ्या गोष्टींसाठी त्याचा उपयोग होणार असेल तर निश्चितच त्याला खूप जास्त महत्त्व आहे. याकडे दोन अंगांनी बघावे लागेल.एक म्हणजे याद्वारे भारताशी संबंधित अचूक माहिती मिळेल. जागतिक पातळीवरील लार्ज लँग्वेज मॉडेलमध्ये आपल्या देशातील वेगवेगळ्या प्रकारचे तपशील तितक्याशा मोठ्या प्रमाणात येत नाहीत. तुलना करायची झाल्यास जगाचा ज्ञानकोश आणि भारताचा ज्ञानकोश यात दिसते तसेच अंतर बघायला मिळेल. पण भारत आपल्यासाठी एआय च्या तंत्रज्ञानाची निर्मिती करेल तेव्हा भारताशी संबंधित सर्व छोटे-मोठे तपशील येऊ शकतील. अर्थातच ते स्थानिक व्यापार-उदिमसाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतात. अगदी साधे उदाहरण घ्यायचे तर भारतातील कला, संस्कृती, इतिहास अशा बाबींची माहिती तिथे असेल तर सर्व प्रकारचे व्यवसाय, धंदे त्या आनुषंगाने आपला व्यवसाय पुढे नेऊ शकतात. त्या दृष्टीने सॉफ्टवेअर निर्माण करणे वा अशी कामे ते करु शकतात. भारतात येऊ पाहणाऱ्या विदेशी पर्यटकांनी या चॅटजीपीटीला भारताशी संबंधित प्रश्न विचारले, तर अधिक अचूक आणि परिपूर्ण माहिती मिळू शकते. या माध्यमातून ते हवा तेवढा तपशील मिळवू शकतात.लार्ज लँग्वेज मॉडेलमध्ये माहितीचे साठे खूप मोठ्या प्रमाणावर असतात. पण याच्या जोडीला भारतात स्मॉल लँग्वेज मॉडेल्सही तयार होऊ शकतात. ती त्या त्या व्यवसायासाठी, राज्यासाठी वा अगदी गावासाठीही कामी येऊ शकतात, कारण विविध पातळ्यांवर बनवता येऊ शकतात. याला आपण फोकस लँग्वेज मॉडेलही म्हणू शकतो. पण त्याचबरोबर इथे केवळ फोकस माहितीच नव्हे तर, अन्य प्रकारेही कृत्रीम बुद्धिमत्ता मदत करु शकते. जसे की, हे तंत्रज्ञान विशेष मुलांसाठी कशा प्रकारची चित्रे आणि व्हीडिओ असू शकतात, हे बघून त्यानुसार संशोधन समोर मांडेल. थोडक्यात, अशा प्रकारचे अनेक प्रयोग करण्यास मोठा वाव आहे. स्थानिक पातळीपासून देशाच्या पातळीपर्यंत ते राबवता येऊ शकतात. पण त्यासाठी प्रोत्साहन दिले गेले पाहिजे. आवश्यक तेवढा निधी आला पाहिजे. विशेष म्हणजे अगदी छोट्या छोट्या गोष्टींसाठी याचा वापर करुन घेता येतो, यासंबंधीची जाण लोकांमध्ये आली पाहिजे. अशा अंगांनी वापरल्यास हे तंत्रज्ञान लक्षणीय बदल घडवून आणू शकेल. एकदा हे साधले की जागतिक पातळीवरील व्यापारवृद्धीच्या संधी खुल्या होण्यास फारसा वेळ लागणार नाही.

# टाकरवन येथील ग्राम दरबारात सरकारच्या शेकडो योजनेची ग्रामस्थांना दिली माहिती

## प्रशासन नागरिकांचा संवाद; सरकारी कार्यालयाची पाहणी

**माजलगाव | प्रतिनिधी**


माजलगाव पंचायत समिती व ग्रामपंचायत कार्यालय टाकरवण यांच्या संयुक्त विद्यमाने टाकरवण येथे ता.२८ शुक्रवार रोजी ग्राम दरबार उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विवीध विभागाच्या अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधून योजनांची माहिती दिली. एक दिवस गावकऱ्यांसाठी अभियाना दरम्यान गावातील महिला, पुरुषांनी उपस्थित राहून सरकारी योजना आणि त्याचे फायदे समजावुन घेतले. विभागीय आयुक्त संभाजीनगर यांच्या आदेशानुसार प्रत्येक तालुक्यातून एका ग्रामपंचायतीची निवड करून ग्राम दरबार उपक्रम राबवण्यात येत आहे. या अभियानांतर्गत माजलगाव तालुक्यातील टाकरवण ग्रामपंचायतीची निवड करण्यात आली होती. सर्व प्रशासन गावात पोहोचले. या कार्यक्रमाच्या आध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी ज्योत्सना मुळीक या उपस्थीत होत्या यावेळी कृषी विभाग, शिक्षण विभाग, महिला व बालकल्याण विभाग, आरोग्य विभाग, पशुसंवर्धन विभाग, समाज कल्याण विभाग, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, सिंचन व जलसंधारण विभाग, बॅक, आदी विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्यांनी सर्व सरकारी योजनेची माहिती उपस्थीतांना दिली. सरकारच्या अनेक योजना नागरिकांना माहीत नाहीत किंवा त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत. सरकारची प्रत्येक योजना आणि त्याचे फायदे नागरिकांना महिलांना माहिती व्हावेत आणि गावाच्या व नागरिकांच्या समस्या मार्गी लागाव्यात या मुख्य उद्देशाने एक दिवस गावकऱ्यांसाठी अभियानातून ग्राम दरबार उपक्रमाचे आयोजन केले आहे. या उपक्रमामुळे नक्कीच टाकरवण येथील नागरीकांना याचा फायदा होईल असे मत गटविकास अधिकारी ज्योत्सना मुळीक यांनी व्यक्त केले. त्यानंतर जिल्हा परिषद शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामपंचायत कार्यालय, अंगणवाडी, आदी कार्यालयाची पहाणी करून समस्या जाणून घेतल्या. गावातील नागरीक व प्रशासनाच्या आधिकाऱ्यांमध्ये तब्बल तीन तास संवाद झाला दरम्यान अनेक समस्या अधिकाऱ्यांनी समजून घेतल्या. यावेळी ग्रामविकास अधिकारी नाईक, सरपंच सुनील तौर, उपसरपंच दयानंद गोबरे, आजी माझी सरपंच विविध संस्थेचे संचालक ग्रामपंचायतचे सर्व सदस्य नागरीक मोठ्या संख्यने उपस्थीत होते.



# पारंपारिक शिवजयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी संतोष काळे यांची निवड

**अंबाजोगाई | प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथील पारंपरिक शिवजयंती उत्सव समिती, कुत्तर विहीर, आयोजित शिवजन्मोत्सव समितीची कार्यकारणी जाहीर झाली असून पारंपारिक शिवजयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी माजी नगरसेवक संतोष काळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.



प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी पारंपारिक शिवजयंती उत्सव समितीची बैठक शुक्रवारी संपन्न झाली. मागील ६१ वर्षापासून शहरातील कुत्तरविहीर परिसरातील नागरिक शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहाने साजरी करत असतात. या मिरवणुकीमध्ये विविध प्रकारचे शिवकालीन खेळ दाखवले जातात तर उंट घोडे या मिरवणुकीचे विशेष आकर्षण असते हजारोंच्या संख्येने अंबाजोगाई कर या पारंपारिक शिवजयंती उत्सव समितीच्या मिरवणुकीत सहभागी असतात. शहरात दि. २८ फेब्रुवारी शुक्रवार रोजी आयोजित केलेल्या नियोजन बैठकीदरम्यान पारंपारिक शिवजयंती उत्सव समिती २०२५ ची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

या कार्यकारणी मध्ये अध्यक्षपदी माजी नगरसेवक संतोष काळे , उपाध्यक्षपदी शिवसंग्राम चे तालुकाध्यक्ष धणेश गोरे, राम घोडके, कोषाध्यक्षपदी युवा उद्योजक गणेश देशमुख, गणेश कडबाने, सचिव अभि काळे, अक्षय जाधव, प्रसिद्धी प्रमुख पदी सतीश मोरे,सहसचिव शशी कुमार वाघमारे, अभिमन्यू काळे कृष्णा मैंद, मिरवणूक प्रमुख गणेश दादा मसणे, सुनील काळे, हर्ष जाधव, भारत कदम शरद माळी, बाळासाहेब देशमुख, सचिन सावरे, सुरेश बलुतकर, कल्याण अण्णा काळे यांच्यासह विविध समितीची निवड करण्यात आली आहे. निवड झालेल्या अध्यक्षांचा स्वागत व सत्कार या बैठकीत सर्वांमध्ये करण्यात आला. दरवर्षीपेक्षा यावर्षी शिवजयंती एक आगळावेगळ्या पद्धतीने व पारंपारिक पद्धतीने साजरी होणार असे मत सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष संतोष काळे यांनी व्यक्त केला आहे.

पारंपारिक शिवजयंती उत्सव समिती ची कार्यकारणी जाहीर होताच सर्व स्तरातून या कार्यकारिणीचे स्वागत होत आहे.

# धर्मवीर प्रतिष्ठान आयोजित भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ

**बीड | प्रतिनिधी**

धर्मवीर प्रतिष्ठान आयोजित भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा बीड तालुक्यातील काकडहिरा ता. जिल्हा बीड येथे पार पडली यावेळी बीड जिल्ह्यातील अनेक संघानी या स्पर्धेत भाग घेतला. या स्पर्धेचे उद्घाटन बाजीराव दादा चव्हाण यांच्या वतीने लिंबाजी मामा जाधव हस्ते करण्यात आले होते.आज धर्मवीर प्रतिष्ठान आयोजित भव्य टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचा शेवटचा सामना मोटे इलेव्हन बीड व शिवनेरी क्रिकेट क्लब बीड यांच्या मध्ये पार पडला. या अटीतटीच्या सामन्यात मोटे इलेव्हन संघ मोठ्या फरकाने विजयी झाला.ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी धर्मवीर प्रतिष्ठानचे सहकारी सदस्य व काकडहिरा ग्रामपंचायतचे उपसरपंच विशाल बागलाने व धर्मवीर प्रतिष्ठानच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेऊन ही स्पर्धा यशस्वी रित्या पार पाडली



आज शेवटच्या सामन्या नंतर विजयी संघाला धर्मवीर प्रतिष्ठान कार्यालय व बाजीराव दादा चव्हाण जनसंपर्क कार्यालय बीड येथे बाजीराव दादा चव्हाण यांच्या वतीने धर्मवीर प्रतिष्ठानचे जिल्हाध्यक्ष लिंबाजी मामा जाधव,शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाप्रमुख महादेव मातकर यांच्या हस्ते मोटे इलेव्हन संघाचे कॅप्टन विवेक मोटे यांच्याकडे ५१ हजार रुपये रोख बक्षिस व ट्रॉफी देऊन विजयी संघाचे अभिनंदन करण्यात आले.यावेळी विशाल बागलाने,रोहित धुरंधरे, पंकज कदम, विलास मस्के,संदीप माने, ज्योतीराम फरताडे, सचिन गाडे, यांच्यासह धर्मवीर प्रतिष्ठानचे सहकारी उपस्थित होते.

## कॉपीमुक्त अभियानाचा उडाला फज्जा

# धारूरमध्ये दहावी इंग्रजीचा पेपर फुटला; दोघे पोलिसांच्या ताब्यात

**किल्ले धारूर (प्रतिनिधि):** एसएससी बोर्ड दहावीच्या परीक्षा सध्या सुरू आहेत.१ मार्च शनिवार रोजी इंग्रजीचा पेपर असल्याने शिक्षण विभागाकडून विशेष खबरदारी घेतल्यानंतरही दोन मुलांनी साडेअकरा वाजता इंग्रजीचा पेपर खिडकीतून घेऊन पलायन केले. पेपर फुटल्याची बातमी सर्वत्र चविने चर्चिली जात असतानाच पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी अतिशय शिताफीने अवघ्या अर्ध्या तासात पेपर फोडणाऱ्या दोघांनाही ताब्यात घेऊन पोलिसी खाक्या दाखवत फोडलेला पेपर जमा करून घेतला.

बोर्ड परीक्षा मागील काही वर्षात धारूर शहरात शांततेत आणि व्यवस्थित पार पडत होत्या.परंतु यंदा सध्या सुरू असलेल्या एसएससी बोर्ड दहावीच्या १ मार्च शनिवार रोजी होत असलेल्या इंग्रजी पेपर काही पोरांनी फोडल्याची घटना धारूर शहरातील जिल्हा परिषद शाळेतील परीक्षा केंद्रावर घडली. सदरील बाबीची माहिती मिळतात पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी अवघ्या अर्ध्या तासात सीताफिने त्या पेपर फोडणाऱ्या पोरांना ताब्यात घेऊन पोलिसी खाक्या दाखवत पेपर उपलब्ध करून घेतला. परंतु बोर्ड परीक्षा त्यातच इंग्रजी चा पेपर अर्धा ते पाऊण तासात फुटला असल्याने विद्यार्थी आणि पालकांमध्ये आता संभ्रम निर्माण झाला आहे. धारूर तालुका शिक्षणाधिकारी मनोज कोल्हे शी बोलताना ते म्हणाले सदरील पेपर फुटलेल्या प्रकाराची शिक्षण विभागातील वरिष्ठांना माहिती दिली आहे असुन पेपर फोडणाऱ्या आरोपीवर गुन्हा नोंद करण्याची कारवाई सुरु करण्यात आली आहे.



# छत्रपती शिवरायांबद्दल गरळ ओकणाऱ्या कोरटकर विरोधात लिंबागणेशकरांचे जोडे मारो आंदोलन



**लिंबागणेश (प्रतिनिधी):** रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज , राजमाता जिजाऊ यांच्या बद्दल आक्षेपार्ह व बदनामीकारक वक्तव्य करून शिवप्रेमींच्या भावना दुखावणा-या नागपुरच्या प्रशांत कोरटकर यांना तात्काळ अटक करून त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि. ०१ शनिवार रोजी सकाळी ११ वाजता लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात जोरदार घोषणाबाजी करत प्रशांत कोरटकर यांच्या प्रतिमेला जोडे मारून निषेध व्यक्त करण्यात आला.ईतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना मोबाईल वरून धमकी देताना प्रशांत कोरटकर यांने महाराष्ट्राची अस्मिता असलेले रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या बद्दल हिनकस वक्तव्य केले असुन दोन समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न देखील केला आहे.तसेच विकृत लेखक जेम्स लेन यांनी छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या बद्दल अत्यंत विकृत लिखाणाचे समर्थन करून तमाम शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या आहेत. मराठा समाजाला शिविगाळ करून समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे तसेच ईतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे. महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्याचे नाव घेऊन सदर व्यक्तीने हे वक्तव्य करत धमकी दिल्यामुळे हे प्रकरण अत्यंत संवेदनशील असुन तातडीने कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक बीड यांच्या

# वडखेल येथे एक दिवस गावकऱ्यांसोबत ग्राम दरबार उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

## पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या शासनाच्या सर्व कल्याणकारी योजनाचा नागरिकांनी लाभ घ्यावा– स.गटविकास अधिकारी शिवाजी मुंडे

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी):** परळी वैजनाथ तालुक्यातील नागरिकांनी परळी पंचायत समिती अंतर्गत व शासनाच्या सर्व कल्याणकारी योजनाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे अवाहन पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी शिवाजी मुंडे यांनी परळी पंचायत समितीच्या वतीने वडखेल येथे एक दिवस गावकऱ्यांसोबत ग्राम दरबार उपक्रमाच्या प्रसंगी बोलत होते. वडखेल येथे एक दिवस गावकऱ्यांसोबत ग्राम दरबार उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी नागरिक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

याबाबत अधिक माहिती अशी की, भारतातील ६५% लोकसंख्या आजही ग्रामीण भागात राहत आहे. ग्रामीण भागातील पुनरुत्थानासाठी शासनामार्फत विविध उपक्रम राबविले गेले. महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील खेडी ही स्वयंपुर्ण, स्वयंशासीत असावीत अशी सर्व ग्रामस्थांची अपेक्षा असते. शासनाच्या विविध योजना, उपक्रम व सेवा ग्रामस्थांच्या दारी पोहचविणे हेच सुप्रशासनाचे लक्षण आहे. याच मुद्दावर आधारीत ग्रामीण भागात काम करणा-या सर्व विभागांच्या अधिका-यांमार्फत प्रत्येक गावामध्ये विविध सेवा ठराविक कालावधीत पोहचविण्याच्या अनुषंगाने एक दिवस गावक-यांसोबत (ग्राम दरबार) हा नाविन्यापुर्ण उपक्रम छत्रपती संभाजीनगर विभागात राबविणे येत आहे. त्यानुषंगाने जिल्हा परिषद बीड व परळी वैजनाथ पंचायत समिती आणि ग्रामपंचायत कार्यालय वडखेल यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. २८ फेब्रुवारी रोजी एक दिवस गावकऱ्यांसोबत... हा ग्राम दरबार सारखा नवीन उपक्रम राबविण्यात आला. आज या ग्राम दरबाराच्या निमित्ताने सहाय्यक गटविकास अधिकारी शिवाजी मुंडे यांनी उपस्थित राहून ग्रामस्थांशी संवाद साधला तसेच त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. पंचायत समिती अंतर्गत व शासनाच्या सर्व कल्याणकारी योजनाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे अवाहन पंचायत समितीचे सहाय्यक गटविकास अधिकारी शिवाजी मुंडे यांनी केले. शासनाच्या विविध विकास योजने विषयी पंचायत समिती मधील सर्व विभाग प्रमुख यांनी ग्रामस्थ



मार्गदर्शन केले. शासनाच्या विविध योजना, उपक्रम, धोरण आणि सेवा ग्रामस्थांच्या दारी पोहोचवण्याचा उद्देशाने या लोकोपयोगी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ग्रामपंचायत, शिक्षण, कृषी, महिला व बालकल्याण, आरोग्य, पशुसंवर्धन, समाज कल्याण, पाणीपुरवठा, स्वच्छता, सिंचन व जलसंधारण या संदर्भातील अडचणींवर सविस्तर चर्चा केली. तसेच त्यावर तोडगा काढयासाठी कटीबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. शासनाच्या योजना प्रत्येक लाभार्थी पर्यंत पोहचविण्यात येणार आहे. जनहिताचा निर्णय घेवून पादरर्शकपणे आयोजित केलेल्या या लोककल्याणकारी उपक्रमास ग्रामस्थ यांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला.

यावेळी पंचायत समिती परळी चे सहाय्यक गट विकास अधिकारी शिवाजीराव मुंडे, पंचायत समिती धारूर सहाय्यक गट विकास अधिकारी श्री शेषेराव कांदे साहेब,विस्तार अधिकारी साहेबराव भताने , एस आर एल एम विभागाचे सचिन हरणावळ, विस्तार अधिकारी अंबोरे, घरकुल विभागाचे बुरकुले, एम आर इ जी चे कांदे, व संजय जाधव पशुसंवर्धन विभागाचे डॉक्टर झिंगरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे रत्नाकर देवकते, मुन्ना कराड तसेच सरपंच भारतबाई व्यंकटराव देवकते, उपसरपंच श्रीमती कौसाबाई चव्हाण ग्रामपंचायत सदस्य भागवत देवकते, अनुरथ खरात, भीमराव आगलावे, श्रीमती गंगाबाई घुमरे , लक्ष्मण गंगणे यांच्यासह विविध विभागाचे कर्मचारी उपस्थित होते विविध विभागामार्फत चालवल्या जाणाऱ्या योजेनेची माहिती गावातील उपस्थित नागरिकांना देण्यात आली व वडखेल गावात आलेल्या विविध अधिकारी कर्मचारी यांनी वडखेल गावात चालवल्या जाणाऱ्या उपक्रमाची माहीती घेऊन कामाबद्दल समाधान व्यक्त केले. या कर्यक्रमाचे सूत्रसंचलन पंचायत समितीचे विस्तार अधिकारी साहेबराव भताने यांनी केले तर आभार अंगद देवकते व गोविंद देवकते यांनी मानले.

# मोरेवाडी साठवण तलावाच्या भूमिपूजन झाल्याशिवाय मोरेवाडीत येणार नाही हा शब्द मी पूर्ण केला-आ.धस

**आष्टी । रविंद्रनाथ ठाकूर**

मोरेवाडी साठवण तलावासाठी मी गेल्या दहा वर्षापासून प्रयत्न करत असून पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी मी एकट्याने प्रयत्न केला आणि प्रमाणपत्र मिळवल्यानंतर गेल्या दहा वर्षातील दोन लोकप्रतिनिधींनी याविषयी एक कागद हलवलेला नाही. त्यामुळे मी साठवण तलावाचे भूमिपूजन करण्यासाठीच गावात येईल असा मोरेवाडीकरांना दिलेला शब्द आज पूर्ण करत आहे.या साठवण तलावाच्या भूमिपूजनासाठी मोरेवाडी येथे आलो आहे.या तलावामुळे परिसरातील शेतकऱ्यांना शेती सिंचनासाठी मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले.ते मृद व जलसंधारण विभाग बीड यांच्या अंतर्गत आष्टी तालुक्यातील मोरेवाडी साठवण तलाव भूमिपूजन समारंभ प्रसंगी ते मार्गदर्शन करताना बोलत होते.लोकनेते आमदार सुरेश धस यांच्या शुभहस्ते साठवण तलाव कामाचे भूमिपूजन करण्यात आले.

आ.धस बोलताना पुढे म्हणाले की,२०१४ पासून या तलावाच्या कामासाठी आपण होतो.त्याच काळात पाणी उपलब्धतेचे प्रमाणपत्र मिळाले.मात्र हे काम गेल्या दहा वर्षांपासून प्रलंबित होते. या दहा वर्षाच्या कालावधी नंतर आज प्रत्यक्षात या तलावाचे काम सुरू होत आहे.याचा मनस्वी आनंद होत आहे. या तलावामुळे परिसरातील अनेक शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे.मोरेवाडी ग्रामस्थांची अनेक दिवसापासूनची ही मागणी होती मागील दहा वर्षांमध्ये या कामात कोणतीही प्रगती



झालेली नाही.मोरेवाडीला या तलावाच्या भूमिपूजनाच्या अगोदर येणार नाही असे आपण ठरवले होते. अखेर मोरेवाडी साठवण तलावाचे आज भूमिपूजन करण्यात आले आहे.साठवण तलावाने मोरेवाडी ग्रामस्थांच्या अनेक दिवसांचा प्रश्न मार्गी लागणार असून यातून शेतकऱ्यांच्या जीवनात या प्रकल्पामुळे संजीवनी ठरणार हा प्रकल्पातून शेतकऱ्यांचे जीवमान उंचावण्याचे काम या प्रकल्पामुळे होणार आहे.या साठवण तलाव ७ कोटी ६९.६७ लक्ष रुपये खर्च करून या साठवण तलाव तयार होणार होणार आहे.शेतकऱ्यांचा भुसंपादनाचा देखील प्रश्न मार्गी लागणार आहे. यावेळी मोरेवाडी,शेलारवाडी,केरुळ किनी या गावात या गावचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ह.भ.प.संतोष महाराज मोरे,ह.भ.प.लाड महाराज,ज्येष्ठ पत्रकार प्रफुलभाऊ सहस्त्रबुद्धे, रामहरी महारनोर,अशोक ढवण,सुनील सूर्यवंशी,सरपंच संजय थोरवे,सरपंच अंकुश गीते,शिवाजी अनारसे,कल्याण काकडे,सुंदरलाल गर्जे,भाऊसाहेब गोंदकर,संजय पवार,नामदेव काकडे,महादेव मोरे, जाकीर शेख,झाकीर शेख,संजय निंबाळकर,पप्पू बांदल,उपसरपंच सय्यद,माऊली फंड, ज्युनिअर इंजि.मुंडे साहेब आदी उपस्थित होते.

# सरपंच सौ.जनाबाई नरहरी काकडे यांचा महाराष्ट्ररत्न आदर्श सरपंच या पुरस्काराने गौरव

**केज । प्रतिनिधी**

या कार्यक्रमाचे ठिकाण पुणे येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक भवन , गंजपेठ , पुणे येथे होते . तसेच साबला येथील लोकप्रिय सरपंच सौ . जनाबाई नरहरी काकडे यांचा महाराष्ट्र रत्न आदर्श सरपंच या पुरस्काराने गौरव .केज तालुक्यातील मौजे साबला . येथील ग्रामपंचायत च्या लोकप्रिय सरपंच सौ . जनाबाई नरहरी काकडे यांना मानाचा महाराष्ट्र रत्न आदर्श सरपंच सन - २०२५ या पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले . तसेच माननीय धनराज सोनवणे - ग्रामपंचायत अधिकारी , ग्रामपंचायत कार्यालय , साबला . यांनाही महाराष्ट्र रत्न आदर्श




ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार - सन - २०२५ या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले . कार्यक्रमाचे आयोजक - माननीय ड . शंकरराव चव्हाण . विश्वनाथ फांऊडेशन , महाराष्ट्र राज्य , भारत . दैनिक शिवजागर . या कार्यक्रमाच्या अध्यक्षा माननीय प्राजक्ता गायकवाड - सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री ,मुंबई महाराष्ट्र राज्य . उत्कृष्ट सिने अभिनेत्री पुरस्कार प्राप्त तसेच या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माननीय ओमकार हनुमंत माने सुप्रसिध्द सिने दिग्दर्शक , मुंबई . माननीय स्मिता राठोड / चावडा . मिसेस ग्लोबल इंडिया . मानतीय सुजाताताई चिंता ( उद्योजिका ) डारेक्टर - सुपर मीटर कंपनी . अध्यक्ष - राजलक्ष्मी फांउडेशन . इत्यादी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण सोहळा पार पडला .सरपंच सौ. जनाबाई काकडे यांनी ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने गावातील केलेल्या विकास कामाबद्दल हा पुरस्कार त्यांना मिळाला आहे .यावेळी उपस्थित ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ , पोपटराव काकडे , पवन सरवदे , आदर्श शिक्षक नरहरी काकडे , दादा परळकर , तानाजी आंडिल , श्रीमती पुजा पांचाळ , श्रीमती प्रिती सरवदे इत्यादी सहकारी पुरस्कार स्विकारते वेळी उपस्थित होते .

# मोदी लर्निंग सेंटर येथे मराठी राजभाषा गौरव दिन साजरा

**अंबाजोगाई (प्रतिनिधी):** मोदी लर्निंग सेंटरच्या श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित न्यू व्हिजन पब्लिक स्कूल अंबाजोगाई येथे कविवर्य कुसुमाग्रज यांची जयंती आणि मराठी राजभाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला . याप्रसंगी शालेय विद्यार्थ्यांनी शाळेचा मूल्य शिक्षणाचा परिपाठ मराठी भाषेतून सादर केला . संगीत समूहाने मराठी भाषेचे गौरव गाणारे गीत सादर केले तसेच मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त शाळेत मराठी हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली.या स्पर्धेत इयत्ता चौथी ते नववी पर्यंतचे विद्यार्थी सहभागी झाले होते. इंग्रजी माध्यमाची शाळा व विद्यार्थी असताना देखील अतिशय उत्कृष्ट अशा प्रकारच्या उत्तम हस्ताक्षरांचा नमुना या सहभागी विद्यार्थ्यांच्या स्पर्धेतून दिसून आला . प्रत्येक वर्गाच्या विजेत्या स्पर्धकांना प्रथम , द्वितीय व तृतीय अशा प्रकारची बक्षीस व प्रमाणपत्र देण्यात आली. संस्थेचे प्राचार्य रेंजु आर चंद्रन यांनी सर्व विद्यार्थ्यांना व मराठी भाषेवर प्रेम करणाऱ्यांना मराठी राजभाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा दिल्या . याप्रसंगी संस्थेचे सचिव राजकिशोर मोदी , कार्यकारी संचालक संकेत मोदी , संस्थेचे मार्गदर्शक वसंतराव चव्हाण , मार्गदर्शक प्राचार्य डी. एच. थोरात , मार्गदर्शक बी. आय खडकभावी यांनी उपस्थित सर्व विद्यार्थी , शिक्षक ,पालकांना शुभेच्छा दिल्या .

# अंबाजोगाई कृषी तंत्र विद्यालयातील वसतिगृहांसाठी तीस कोटींचा निधी

## आ.नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला यश

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथील कृषि तंत्र विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आणि विद्यार्थिनींसाठी नवीन वसतिगृह इमारतींसाठी तब्बल तीस कोटी रुपयांचा निधीस प्रशासकीय मान्यता दिली आहे. यापैकी दोन कोटींचा निधी वितरीत करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. केज विधानसभा मतदार संघाच्या आ.नमिता मुंदडा यांच्या मागणीनंतर महाराष्ट्र शासनाच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या अंतर्गत हा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.



कृषि तंत्र विद्यालयातील विद्यार्थ्यांना निवासासाठी चांगली इमारत असावी यासाठी आ. नमिता मुंदडा प्रयत्नशील होत्या. वसतिगृह इमारती बांधण्याकरिता निधी मिळविण्यासाठी आमदार नमिता मुंदडा यांनी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा केला होता. त्यांचा सातत्यपूर्ण आग्रह आणि पत्रव्यवहार लक्षात घेऊन शासनाने विद्यार्थ्यांसाठी आणि विद्यार्थिनींसाठी नवीन वसतिगृह इमारतींसाठी प्रत्येकी १४ कोटी ८७ लाख रुपयांच्या निधीस प्रशासकीय मान्यता दिली. यापैकी प्रत्येकी एक कोटी असा एकूण दोन कोटींचा निधी वितरीत करण्यास शासनाने दि.२७ फेब्रुवारी गुरुवार रोजी मंजुरी दिली आहे. या शासन निर्णयामुळे अंबाजोगाईतील विद्यार्थ्यांना राहण्यासाठी उत्तम सुविधा मिळणार आहेत. दरम्यान, अंबाजोगाईमध्ये कृषि क्षेत्राच्या सुधारणा, तंत्रज्ञानाचा विकास आणि विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा मिळाव्यात, यासाठी शासनाचे विशेष लक्ष आहे. कृषी शिक्षणाच्या विकासासाठी शासनाने भांडवली निधी मंजूर करत संबंधित कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. शासनाने मंजूर केलेला हा निधी वेळेत वितरित करून कामे जलद गतीने पूर्ण करण्याचा प्रयत्न होणार आहे. नवीन वसतिगृह इमारती उभारल्याने विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि चांगल्या सोयी-सुविधा मिळतील. हे काम वेळेत आणि प्रभावीपणे पूर्ण करण्यासाठी प्रशासनाकडून योग्य ती कार्यवाही केली जाणार आहे. यामुळे कृषि शिक्षणाच्या दर्जामध्ये मोठी सुधारणा होण्याची अपेक्षा आहे.

वसतिगृहासाठी निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री अजित पवार, कृषीमंत्री माणिकराव कोकाटे, ना. पंकजाताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

# धारूर तालुक्यातील आरणवाडी येथे बिबट्याने पाडला गाईचा फडशा

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील आरणवाडी येथे एका शेतकऱ्याच्या गाईचा फडशा बिबट्याने पाडल्याची घटना मंगळवारी रात्री घडली. ज्या ठिकाणी बिबट्याने गाईचा फडशा पाडला त्याच ठिकाणी दुसऱ्याही दिवशी बिबट्या आल्याचे शेतकऱ्यांनी पाहिले गावात बिबट्याचा वावर वाढल्यामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी मात्र याकडे पाठ फिरवल्याचे दिसत आहे.

धारूर तालुक्यात आरणवाडी, चोरंबा, धुनकवाड, आंबेवडगाव परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात उसाचे क्षेत्र आहे. या उसाच्या क्षेत्रामध्ये रानडुकराचे प्रमाण अधिक असल्यामुळे बिबट्याचा वावर अधून मधून वाढल्याचे दिसत आहे. मंगळवारी रात्री अरणवाडी येथील उद्धव रुद्रे यांच्या शेतातील एका गाईचा फडशा बिबट्याने पाडल्याची घटना बुधवारी सकाळी उघडकीस आली. शेतकऱ्यांनी बिबट्या तिथे येतो का हे

### बिबट्यावर लक्ष ठेवण्यासाठी आरणवाडीत बसविले वनविभागाने दोन ट्रॅप कॅमेरे.

**धारूर तालुक्यातील आरणवाडी येथे एका शेतकऱ्याच्या गाईचा फडशा बिबट्याने पाडल्याची घटना मंगळवारी रात्री घडली. ज्या ठिकाणी बिबट्याने गाईचा फडशा पाडला त्याच ठिकाणी दुसऱ्याही दिवशी बिबट्या आल्याचे शेतकऱ्यांनी पाहिले होते. या बिबट्यावर काही बछडे असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितल्यानंतर ज्या ठिकाणी गाईचा फरशा पडला त्या ठिकाणी वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी शुक्रवारी दोन ट्रॅप कॅमेरे बसविण्यात आले आहेत.**



पाहण्यासाठी जागरण केले असता त्या ठिकाणी तीन पिलासह बिबट्या आल्याचे बुधवारी रात्री शेतकऱ्यांना दिसून आले. अरणवाडी परिसरामध्ये बिबट्याचा वावर वाढल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून या ठिकाणी पिंजरा लावून बिबट्याला जेलबंद करण्याची मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

# ३८ वर्षे शिक्षण क्षेत्रात आविरत सेवा करणाऱ्या भाऊसाहेब थेटे यांचा सेवापूर्तीनिमित्त सेवागौरव होणे महत्त्वाचे-माजी आ.साहेबराव दरेकर

**आष्टी । रविंद्रनाथ ठाकूर**

कुठल्याही सेवेत रुजू झाल्यानंतर आपल्या हातून ३८ वर्षात जी सेवा घडते.आपल्या आयुष्यातील मौलिक असते.आपल्या सेवेवरची निष्ठा आपल्याकडून काम करवून घेत असते.कौटुंबिक आयुष्यासाठी जी धडपड सुरु असते त्याची सफलता त्या परिश्रमात दडलेली असते सेवापूर्ती होणाऱ्या कर्मचाऱ्याचा सेवागौरव होणे महत्त्वाचे असते. सलग ३८ वर्षे अविरत शिक्षण विभागात सेवा करणाऱ्या भाऊसाहेब थेटे यांचा सेवापूर्तीनिमित्त सेवागौरव होणे महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन माजी आ.साहेबराव दरेकर यांनी केले.

आष्टी येथील श्री गणेश विद्यालयातील वरिष्ठ लिपीक भाऊसाहेब थेटे यांच्या सेवापूर्तीनिमित्त सेवागौरव कार्यक्रमात ते अध्यक्षस्थाना वरुन बोलत होते.

यावेळी बीड जि.प.चे.माजी सदस्य देविदास धस,जि.प.चे सदस्य डॉ.मधुकर हंबर्डे, विठ्ठलराव बन्सोडे,बीड जि.प.चे माजी सतीषमामा झगडे,सदस्य



कडा डॉक्टर संघटनेचे अध्यक्ष डा.पंडीत खिलारे,पुर्व शिक्षण अधिकारी विक्रम पोकळे,प्राचार्य डा.सोपान निंबोरे, संस्थेचे अध्यक्ष शशीकांत खाडे,संस्थेचे सचिव महेश सावंत, नामदेव राऊत,उत्तम बोडखे,ड. कांतीलाल गव्हाणे,लक्ष्मण रेडेकर,रामराव झांजे,ज्ञानदेव रेडेकर,शांतीलाल रेपाटे,प्रा. ज्ञानेश्वर नवले, रोहिदास गि-हे, भाऊसाहेब कोकणे,विठ्ठल बांदल,ड. नवनाथ विधाते,विजयाताई संत्रे,सुभाष रासकर,गोरख पारखे,टि.आर. ईजारे, लहु करपे,पोपट घुले, बाळासाहेब थेटे,पोपटराव खाडे,मधुकर वांढरे,सुमनबाई थेटे,रामदास भगत,सुभाषशेठ चोरबले,वामनराव निकाळजे,निळकंठ सुंबरे,विक्रम खेडकर,अशोक गाडेकर,दत्तात्रय ढोबळे,गणेश काकडे,हिराबाई तरटे, राजकुमार थेटे,रोहित चौधरी, ज्योतीराम कोकणे,दिपक वांढरे,राजेंद्र लाड, दादासाहेब खाडे,हरिभाऊ जाचक आदि सामाजिक,राजकीय, धार्मिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी माजी आ.साहेबराव दरेकरनाना म्हणाले की, समाजात अंधश्रध्दा वाढत आहे.सरस्वतीला मी मानणारा नाही तर मी सावित्रीबाई फुले यांना मानणारा माणुस आहे. शिकलेल्या महिलासुध्दा सरस्वती पुजन करतात हे दुदैवी बाब आहे.अहो ज्या क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले छत्रपती शिवरायांचा महाराष्ट्र होता. त्यानंतर फुले,शाहु,आंबेडकर यांचा महाराष्ट्र होता.आता आता वाचाळवीरांचा महाराष्ट्र होऊ पाहत आहे.ते थांबले पाहिजे. या गणेश शिक्षण प्रसारक मंडळाने आदर्श विद्यार्थी घडविण्याचे काम केलेले आहे.यावेळी देवीदास धस म्हणाले की,गणेश विद्यालय ही शाळा एक आदर्श व शिस्तप्रिय शाळा आहे.या विद्यालयाने हजारो उच्च शिक्षीत विद्यार्थी घडविले.थेटे सर यांनी अनेक विद्यार्थी घडविले.सत्कारमुर्ती भाऊसाहेब थेटे शाळेत जशी शिस्त लावली तशीच शिस्त कुटुंबातील सदस्यांना लावली आहे असे धस यावेळी म्हणाले.यावेळी प्रस्ताविक मुख्याध्यापक तथा संस्थेचे कोषाध्यक्ष रमेशसिंह भगत यांनी केले.यावेळी ह.भ.प. कारभारी धस महाराज,खाडे सर,विक्रम पोकळे,नामदेव राऊत,स्नेहल थेटे,बीड जि.प.चे माजी सदस्य डा.मधुकर हंबर्डे,बीड जि.प.माजी सदस्य सतीषमामा झगडे यांची भाषणे झाली.यावेळी संचालन नवनाथ मोरे तर आभार अशोक गाडेकर यांनी मानले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077